पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
राजेंद्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

## महाराष्ट्रात भयानक दुष्काळ

# अतिरिक्त खर्च थांबवावेत



### सरकार, समाज व संस्थांनी दुष्काळग्रस्तांना दिलासा द्यावा

**सुहास बेलापुरकर**
नवी मुंबई
मो. ९८९२५१६८१०

महाराष्ट्रात बहुतांश भागात पडलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर, शासकीय उधळपट्टी थांबवून निधी दुष्काळ निवारण कार्यासाठी वळवणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी सर्व शासकीय कार्यक्रम, कार्यालये, लोकप्रतिनिधींसाठी खालील काटकसरीचे उपाय तातडीने आमलात यावेत:

**सत्कार आणि आदरातिथ्यावर पूर्ण बंदी-**

**कृती:** शासकीय किंवा निमशासकीय कार्यक्रमांमध्ये सत्कार, पुष्पगुच्छ, हार देण्याच्या पद्धतीवर संपूर्ण बंदी आणावी.

**उदाहरण:** बुके (पुष्पगुच्छ), शाल, श्रीफळ, पितळी मूर्ती किंवा भेटवस्तू देण्याऐवजी केवळ शाब्दिक स्वागत करून कार्यक्रम पार पाडावेत.

**शासकीय होर्डिंग्स, जाहिरातींवर बंदी**

**कृती:** नेत्यांचे फोटो, शुभेच्छा, शासनाच्या नियमित कामांचे कौतुक करणाऱ्या होर्डिंग्स, फ्लेक्सवर होणारा कोट्यवधींचा खर्च त्वरित थांबवावा.

**उदाहरण:** जाहिरात, प्रसिद्धीचा हा निधी केवळ दुष्काळ निवारण योजनांच्या जनजागृतीसाठी वापरावा.

**लोकप्रतिनिधींच्या वेतनात २५% कपात**

**कृती:** राज्यातील सर्व आमदार, खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधींच्या मासिक वेतनात २५% कपात करून तो निधी थेट 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'त जमा करावा.

**उदाहरण:** ही २५% कपात थेट पगारातून (TDS प्रमाणे) दुष्काळ कालावधीसाठी वळवावी. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनाही ऐच्छिक मदतीचे आवाहन करावे.

**प्रशासकीय खर्चात (जए) किमान २५% कपात**

**कृती:** सर्व सरकारी मंत्रालये, महामंडळे, जिल्हाधिकारी कार्यालयांच्या दैनंदिन प्रशासकीय खर्चात किमान २५% कपात लागू करावी.

**उदाहरण:** कार्यालयांचे नूतनीकरण (Renovation) थांबवणे, नवीन फर्निचर खरेदी फ्रीझ करणे, कागदाचा दोन्ही बाजूने वापर सक्तीचा करणे, प्रिंटिंग खर्च निम्म्यावर आणणे.

**ताफा (Convoy), इंधन खर्चावर मर्यादा**

**कृती:** मंत्री, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दौऱ्यादरम्यान गाड्यांच्या ताफ्यावर, इंधन वापरावर मर्यादा आणावी.

**उदाहरण:** एकाच जिल्ह्यात जाणाऱ्या मंत्र्यांच्या, अधिकाऱ्यांच्या गाड्यांचे एकत्र नियोजन करावे (Shared Transport). सुरक्षेची गरज नसताना पायलट गाड्यांचा वापर टाळावा.

**तारांकित (Five Star) हॉटेल्समधील कार्यक्रमांवर बंदी**

**कृती:** सरकारी बैठका, कार्यशाळा किंवा पत्रकार परिषदांसाठी खासगी आलिशान हॉटेल्स, रिसॉर्ट्स किंवा बँक्वेट हॉल्स भाड्याने घेण्यास पूर्ण बंदी घालावी.

**उदाहरण:** सर्व बैठका सह्याद्री अतिथीगृह, मंत्रालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहातच घ्याव्यात. जेवणाऐवजी साधे चहा-बिस्किट द्यावेत.

**बैठकांसाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा (Virtual Meetings) वापर**

**कृती:** अधिकारी, मंत्र्यांच्या वारंवार होणाऱ्या **आंतर-जिल्हा प्रवासाव, त्यावरील प्रवास भत्त्यावर (TA/DA) नियंत्रण आणावे.**

**उदाहरण:** दैनंदिन आढावा बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (तउ) घ्याव्यात. केवळ प्रत्यक्ष पाहणी, टँकर निरीक्षण किंवा पीक पाहणीसाठीच दौरा करावा.

**परदेश, राज्याबाहेरील अभ्यास दौऱ्यांना स्थगिती**

(पान २ वर)

# जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची चुरस वाढली

## डॉ. सुजय विखे, रणजितसिंह देशमुख, शंकरराव गडाख बिनविरोध




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत आज महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. राहाता सोसायटी मतदारसंघातून माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, संगमनेर सोसायटी मतदारसंघातून रणजितसिंह देशमुख आणि नेवासा मतदारसंघातून माजी मंत्री शंकरराव गडाख यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचालींना वेग आला असून, आता सर्वांचे लक्ष अध्यक्षपदाच्या समीकरणांकडे लागले आहे.

राहाता सोसायटी मतदारसंघात डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विरोधात एकनाथ घोगरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. घोगरे यांच्या अर्जावरील सूचकाच्या स्वाक्षरीबाबत डॉ. विखे यांच्या वतीने आक्षेप घेण्यात आला होता. स्वाक्षरी बनावट असल्याचा दावा पुराव्यानिशी करण्यात आला. छाननीदरम्यान हा आक्षेप ग्राह्य धरला गेल्याने घोगरे यांचा अर्ज बाद झाला आणि डॉ. सुजय विखे पाटील यांची बिनविरोध निवड झाली.

संगमनेर सोसायटी मतदारसंघात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजितसिंह देशमुख यांच्या विरोधात चित्रा गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या अर्जावरील अनुमोदकाच्या स्वाक्षरीबाबत देशमुख यांच्या वतीने आक्षेप घेण्यात आला. संबंधित अनुमोदकाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून ती स्वाक्षरी आपली नसल्याचे सांगितल्याचा दावा करण्यात आला. या प्रकरणावर झालेल्या सुनावणीनंतर चित्रा गायकवाड यांचा अर्ज बाद करण्यात आला. त्यामुळे रणजितसिंह देशमुख यांची बिनविरोध निवड झाली.

दरम्यान, नेवासा मतदारसंघातून माजी मंत्री शंकरराव गडाख हेही बिनविरोध संचालक झाले आहेत. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आतापर्यंत तीन प्रमुख राजकीय नेत्यांचे संचालकपद निश्चित झाले आहे.

जिल्ह्याच्या राजकारणात विखे आणि थोरात हे पारंपरिक राजकीय विरोधक मानले जातात. मात्र, जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने सहकार क्षेत्रात दोन्ही गट एकत्र आल्याचे चित्र आहे. बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विखे, थोरात आणि गडाख यांच्या पातळीवर हालचाली सुरू असल्याचे दिसून येत आहे. सुरुवातीला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार निलेश लंके तसेच शिवसेना शिंदे गटाकडून निवडणुकीत आव्हान उभे करण्याचे प्रयत्न झाले होते.

(पान ४ वर)

# दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे एस.टी. पास शुल्क माफ करा

## आमदार अमोल खताळ यांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- दुष्काळाच्या तीव्र संकटामुळे ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असताना, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्चही पालकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील शालेय, कनिष्ठ महाविद्यालयीन तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या मासिक एस.टी. विद्यार्थी बस पासचे शुल्क शंभर टक्के माफ करावे, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुंबई येथे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन निवेदन दिले.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात आमदार खताळ यांनी म्हटले आहे की, ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयीन तसेच उच्च शिक्षणासाठी आपल्या गावातून तालुका, शहर अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी दररोज एस.टी. बसने प्रवास करावा लागतो. अनेक गावांमध्ये शैक्षणिक सुविधा मर्यादित असल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज मोठे अंतर पार करावे लागते. अशा विद्यार्थ्यांसाठी एस.टी. बस ही सुरक्षित, नियमित आणि परवडणाऱ्या वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. सध्या ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा खर्च कमी झाल्यास पालकांना मोठा आर्थिक आधार मिळू शकतो. त्यामुळे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून परिवहन विभागाने विद्यार्थी बस पासचे शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी आमदार खताळ यांनी केली आहे.

### संगमनेर आगाराला २५ इलेक्ट्रिक बस मंजूर

### १० इलेक्ट्रिक बस गुरुवारी संगमनेरात

**संगमनेर आगारात इलेक्ट्रिक बस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी मागील आठवड्यात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. या मागणीची तातडीने दखल घेत परिवहन मंत्री सरनाईक यांनी संगमनेर आगारासाठी २५ इलेक्ट्रिक 'शिवाई' एस.टी. बस देण्यास मंजुरी दिली आहे त्यातील १० इलेक्ट्रिक बस गुरुवारी संगमनेर आगारात दाखल होणार असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.**

आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येऊ नये, यासाठी शासनाने त्यांच्या प्रवासाचा आर्थिक भार कमी करणे आवश्यक आहे. दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमधील शालेय, कनिष्ठ महाविद्यालयीन आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मासिक एस.टी. विद्यार्थी बस पास शुल्क १०० टक्के माफ करण्याचा शासन निर्णय तातडीने घ्यावा. तसेच या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागीय नियंत्रक आणि आगार व्यवस्थापकांना स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणीही आमदार अमोल खताळ यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली आहे.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

## उस्मान तांबोळी यांची पश्चिम महाराष्ट्र समन्वयकपदी निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : ज. उस्मान करमाळकर तांबोळी यांची ऑल इंडिया काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागाच्या पश्चिम महाराष्ट्र समन्वयक तथा प्रभारी पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे संगमनेर तालुक्यातील अल्पसंख्याक समाजामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडीबद्दल पुणे येथे तांबोळी यांचा गुलपोशी करून सत्कार करण्यात आला. यावेळी तांबोळी अल्पसंख्याक विकास फाऊंडेशन, संगमनेरचे सर्व पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी तांबोळी यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचे कौतुक करून, पश्चिम महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाच्या विविध प्रश्नांना व समस्यांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## पान - १ वरून महाराष्ट्रात दुष्काळाची...

**कृती:** दुष्काळ निवारण होईपर्यंत मंत्री, लोकप्रतिनिधी, सनदी अधिकाऱ्यांच्या सर्व परदेश अभ्यास दौऱ्यावर, राज्याबाहेरील अभ्यास दौऱ्यावर पूर्ण बंदी घालावी.

**उदाहरण:** या अभ्यासासाठी, प्रवासासाठी राखून ठेवलेला सर्व निधी दुष्काळ निवारण योजनांच्या कामांसाठी वळवावा.

**नवीन वाहनांच्या खरेदीवर बंदी**

**कृती:** सर्व शासकीय विभाग, सार्वजनिक उपक्रम महापालिकांमध्ये नवीन गाड्यांच्या खरेदीवर त्वरित बंदी घालावी.

**उदाहरण:** जुन्या वाहनांची दुरुस्ती करूनच काम चालवावे. सध्या उपलब्ध असलेल्या वाहनांचे पुनर्नियोजन दुष्काळग्रस्त भागातील पाहणीसाठी करावे.

**सांस्कृतिक कार्यक्रम, भूमिपूजनांच्या खर्चाला कात्री**

**कृती:** भव्य शासकीय सांस्कृतिक उत्सव, क्रीडा स्पर्धा, पायाभरणी/भूमिपूजनाचे भव्य सोहळे रद्द करावेत.

**उदाहरण:** नवीन विकासकामांचे उद्घाटन किंवा भूमिपूजन हे डिजिटल पद्धतीने अथवा साध्या इनडोअर कार्यक्रमाद्वारे करावे. स्टेज, मंडप, ध्वनिव्यवस्था, रोषणाईवर होणारा लाखो रुपयांचा खर्च थेट 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'त जमा करावा.

दुष्काळाच्या या गंभीर परिस्थितीत प्रत्येक सरकारी रुपया जनतेच्या पाण्यासाठी, पिकांच्या संरक्षणासाठी वापरला गेला पाहिजे. सत्कार, होर्डिंग्स, व्हीआयपी संस्कृतीवर होणारी निरर्थक उधळपट्टी तात्काळ थांबवून लोकप्रतिनिधींनी आपल्या वार्षिक पगारातील २५% हिस्सा देऊन या दुष्काळचा सामना करण्यासाठी अग्रभागी उभे राहिले पाहिजे.

महाराष्ट्रातील सर्व आमदार, खासदार, नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांच्या पगारातून २५% कपात केल्यास वर्षाला सुमारे २५ ते ३० कोटी रुपये जमा होऊ शकतात. तसेच, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापना/प्रशासकीय खर्चात २५% कपात केल्यास वर्षाला सुमारे ३,००० ते ५,००० कोटी रुपयांची मोठी बचत होऊ शकते. हा एकूण सुमारे ४,००० ते ५,००० कोटी रुपयांचा निधी दुष्काळग्रस्त भागात पाण्याचे टँकर, चारा छावण्या, शेतकरी मदतीसाठी वापरता येऊ शकतो.

# शैक्षणिक शुल्क माफीसाठी विद्यार्थी रस्त्यावर

## विद्यापिठाचे स्पष्ट निर्देश, शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांना फी परत मिळणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- राज्य सरकारने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतलेला असतानाही पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जात असल्याच्या निषेधार्थ छात्रभारती विद्यार्थी संघटनेच्या वतीने सह्याद्री महाविद्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क न भरण्याचे स्पष्ट निर्देश पुणे विद्यापीठाकडून देण्यात आले आहेत.

सरकारने शुल्कमाफीचा निर्णय जाहीर करूनही विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केले जात असल्याने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची फसवणूक का केली जात आहे? असा संतप्त सवाल छात्रभारतीने उपस्थित केला. विद्यार्थ्यांवरील आर्थिक बोजा तातडीने दूर करण्याची मागणी करत कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

आंदोलनाची दखल घेत पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र तलवारे यांनी छात्रभारतीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरू नये. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षा अर्ज भरून तो संबंधित महाविद्यालयात जमा करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, आतापर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांचे शुल्क परत करण्यात येईल, असे आश्वासनही डॉ. तलवारे यांनी दिले. संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



अहमदनगर, अहिल्यानगर, पुणे आणि नाशिक विभागातील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरू नये, असे आवाहन छात्रभारतीने केले आहे. एखाद्या महाविद्यालयाने शुल्क भरल्याशिवाय परीक्षा अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्यास विद्यार्थ्यांनी तातडीने छात्रभारती विद्यार्थी संघटनेशी संपर्क साधावा, असे संघटनेने स्पष्ट केले. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेतले जाणार नाही आणि ज्यांनी शुल्क भरले आहे, त्यांचे शुल्क परत केले जाईल, असे विद्यापीठाकडून स्पष्ट आश्वासन मिळाल्यानंतर छात्रभारतीने रस्ता रोको आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले, राज्य सदस्य मोहम्मद कैफ तांबोळी, राहुल जर्हाड, अभिषेक वैराळ, अनिकेत खरात, सोहम घुले, सुहानी वाघमारे, प्रणाली फटांगरे यांच्यासह छात्रभारतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी छात्रभारतीचा लढा सुरूच राहणार असून, कोणत्याही महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहेपस्थित केला जात आहे.

## आकाशवाणी भवनात घुसल्याप्रकरणी राहुल गांधींसह विरोधी खासदारांवर गुन्हा दाखल

दिल्ली पोलिसांनी आकाशवाणी भवनात जबरदस्ती घुसल्याच्या आरोपावरून राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह अनेक विरोधी खासदारांविरोधात एफआयआर दाखल केला आहे. आकाशवाणीच्या वतीने तक्रार करण्यात आली आहे. खरं तर, मंगळवारी विरोधी खासदार मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या आणि SIRच्या निषेधार्थ निवडणूक आयोगापर्यंत 'सेव्ह डेमोक्रसी' मार्च काढत होते. पोलिसांनी मार्गात बॅरिकेड्स लावले आणि नेत्यांना बसमध्ये बसवून आंदोलन संपवण्याची तयारी केली.

याचदरम्यान राहुल गांधी आणि प्रियंका गांधी अचानक बसमधून उतरून आकाशवाणी भवनाच्या आत गेले. दोघेही परिसरातील वडाच्या झाडाखाली धरण्यावर बसले.

दरम्यान, आज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी विरोधी खासदारांना दिल्लीत दुपारी १ वाजता दुपारच्या जेवणासाठी बोलावले आहे. या बैठकीत सर्व खासदार मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची भेट घेण्यासाठी वेळ मागणाऱ्या पत्रावर स्वाक्षरी करतील.दिल्ली पोलिसांनी दावा केला होता की, सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना माहिती मिळाली की INDIA आघाडीचे नेते ६ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे १०:३० वाजता संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे मोर्चा काढणार आहेत. त्यांनी सांगितले की, यासाठी कोणताही अर्ज देण्यात आला नव्हता, त्यामुळे आमच्याकडून कोणतीही परवानगी जारी करण्यात आली नव्हती. या जमावामुळे इछडच्या कलम १६३ अंतर्गत निषेधाज्ञेचे उल्लंघन होण्याची शक्यता असल्याने सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती.

# संगमनेरचा चेहरा राजस्थानच्या रॉयल इंटरनॅशनल मंचावर झळकला

## हर्षदा नाईक गायकवाड ठरली ' मिस राजस्थान'



संगमनेर - संगमनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. संगमनेरची कन्या हर्षदा नाईक गायकवाड हिने पुणे येथे आयोजित राजस्थानच्या आंतरराष्ट्रीय मॉडेलिंग स्पर्धेत तब्बल १५० मॉडेलसमधून "Miss Rajasthan Model of the Year २०२६' हा मानाचा किताब पटकावला. हर्षदाच्या या उल्लेखनीय यशामुळे संगमनेरचे नाव पुन्हा एकदा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले आहे.

हर्षदाने यापूर्वीही "Miss Maharashtra Model of the Year 2023' हा किताब पटकावून आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली होती. त्यानंतर आता राजस्थानच्या रॉयल इंटरनॅशनल मंचावर मिळविलेल्या या यशामुळे तिच्या मॉडेलिंग क्षेत्रातील कारकिर्दीला आणखी मोठी झेप मिळाली आहे.

पुण्यात झालेल्या या भव्य स्पर्धेत देशातील विविध भागांतून आलेल्या सुमारे १५० मॉडेल्सनी सहभाग घेतला होता. त्यामधून हर्षदाची विजेती म्हणून निवड करण्यात आली. तिच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला, व्यक्तिमत्त्वाला आणि मॉडेलिंगमधील कौशल्याला परीक्षकांनी दाद दिली. आयोजकांच्या मते, मॉडेलिंग क्षेत्राला नवी ओळख मिळवून देणे तसेच प्रतिभावान मॉडेल्सना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे.

या दिमाखदार सोहळ्याला ऑल इंडिया फॅशन असोसिएशनचे संस्थापक चार्ल्स विल्यम्स तसेच सुपरस्टार अब्दुल ख़ासिम बजानिया यांची विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची रंगत आणखी वाढली. या कार्यक्रमाचे आयोजन रॉयल पेजेंट यांच्या वतीने करण्यात आले, तर हिंदुस्तान बियर्ड क्लब यांच्या वतीने कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

हर्षदा नाईक गायकवाड हिच्या या यशामुळे संगमनेरकरांच्या आनंदात भर पडली असून, विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या संगमनेरच्या कन्यांच्या यादीत तिचे नाव अभिमानाने नोंदले गेले आहे. तिच्या पुढील यशस्वी वाटचालीस संगमनेरकरांकडून मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

# आंदोलन मागे घ्या, अभ्यासावर लक्ष केंद्रित करा

## विद्यार्थी समाजकंटक नाहीत, त्यांना आंदोलनाचा अधिकार - उच्च न्यायालय

युवावार्ता (प्रतिनिधी)

मुंबई - एमपीएससी परीक्षेतील विविध मागण्यांसाठी पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दखल अखेर मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे. या आंदोलनाविरोधात दाखल याचिकेवर मुख्य न्यायाधीश महेश चंद्र त्रिपाठी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत, विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेऊन अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, अशी विनंती केली.



सुनावणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या भूमिकेवर भाष्य करताना मुख्य न्यायाधीशांनी याचिकाकर्त्यांना फटकारले. विद्यार्थ्यांना आंदोलन करण्याची हौस नाही. ते पुण्यात संघर्ष करून शिकत असतात. ते समाजकंटक नाहीत. परीक्षेत काही घोळ झाला असेल तर त्यांना आंदोलन करण्याचा अधिकार आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

एमपीएससीच्या परीक्षेतील कथित अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांवरून पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामुळे परीक्षेच्या तयारीवर परिणाम होत असल्याचे एकीकडे सांगितले जात असताना, दुसरीकडे आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करणे हा विद्यार्थ्यांचा अधिकार असल्याची भूमिका आंदोलकांकडून घेतली जात आहे.

या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाच्या सुनावणीकडे विद्यार्थी, पालक आणि एमपीएससीची तयारी करणाऱ्या उमेदवारांचे लक्ष लागले होते. न्यायालयाने विद्यार्थ्यांची परिस्थिती आणि त्यांच्या आंदोलनामागील भूमिका समजून घेतल्याचे निरीक्षणांमधून स्पष्ट झाले. त्याचवेळी आंदोलन थांबवून अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहनही न्यायालयाने केले आहे.

आता न्यायालयाच्या विनंतीनंतर पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे घेतले जाणार की मागण्यांवर ठाम राहत आंदोलन सुरूच ठेवले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या एमपीएससी आंदोलनाच्या तिढ्यावर पुढील काळात तोडगा निघतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# गृहकर्जधारकांना मोठा झटका; रेपो दर ५.५० टक्क्यांवर

## चार वर्षांनंतर प्रथमच वाढ; गृह, वाहन व वैयक्तिक कर्जाचा ईएमआय वाढण्याची शक्यता

मुंबई - वाढती महागाई, कच्च्या तेलाच्या दरातील चढ-उतार, जागतिक आर्थिक अस्थिरता आणि बाजारातील अनिश्चितता या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) बुधवारी महत्त्वाचा निर्णय घेत रेपो दरात २५ बेसिस पॉईंटची वाढ केली. त्यामुळे रेपो दर ५.२५ टक्क्यांवरून ५.५० टक्क्यांवर पोहोचला आहे. फेब्रुवारी २०२३ नंतर प्रथमच आरबीआयने रेपो दरात वाढ केली आहे.

आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पतधोरण समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महागाईवरील वाढता दबाव आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढ यामुळे



महागाईचा धोका वाढल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर जागतिक पातळीवरील आर्थिक आणि भू-राजकीय घडामोडींचाही भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. रेपो दर वाढल्याने बँकांच्या कर्जाचा निधी उभारण्याचा खर्च वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे गृहकर्ज, वाहनकर्ज आणि वैयक्तिक कर्जाच्या व्याजदरावर परिणाम होऊ शकतो. विशेषतः फ्लोटिंग रेटवर गृहकर्ज घेतलेल्या ग्राहकांच्या मासिक हप्त्यात (ईएमआय) वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, ईएमआयमध्ये वाढ किती आणि कधी होईल, हे संबंधित बँकेच्या व्याजदराच्या रचनेवर आणि कर्जाच्या रीसेट तारखेवर अवलंबून असेल. गेल्या काही महिन्यांत महागाईचा दबाव वाढत असल्याने आरबीआयने पतधोरणाची भूमिका बदलली आहे. समितीने आपली भूमिका 'न्यूट्रल'वरून 'कॅलिब्रेटेड टाइटनिंग' अर्थात महागाईच्या परिस्थितीनुसार टप्प्याटप्प्याने आर्थिक धोरण कडक करण्याकडे वळवली आहे. यामुळे आगामी काळात व्याजदरांबाबत आरबीआयची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. आरबीआयने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी देशाच्या जीडीपी वाढीचा अंदाज ६.७ टक्क्यांवरून ७.१ टक्के केला आहे. मात्र, त्याचवेळी महागाईचा अंदाज ५.२ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना देतानाच महागाईवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान आरबीआयसमोर कायम आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये रेपो दर ६.५० टक्क्यांवर नेल्यानंतर तो बराच काळ कायम ठेवण्यात आला होता. त्यानंतर फेब्रुवारी २०२५ पासून आरबीआयने रेपो दरात टप्प्याटप्प्याने कपात करत तो ५.२५ टक्क्यांपर्यंत आणला होता. मात्र, वाढत्या महागाईच्या दबावामुळे आता पुन्हा दरवाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. आरबीआयच्या या निर्णयामुळे कर्जदारांच्या मासिक बजेटवर अतिरिक्त भार पडण्याची शक्यता असून, आगामी काळात बँका कर्जाच्या व्याजदरात काय बदल करतात, याकडे गृहकर्जधारकांचे लक्ष लागले आहे.

# दुष्काळात 'चारा बँक' ठरणार पशुधनासाठी आधार- डॉ. ढगे

युवावार्ता (प्रतिनिधी)

नेवासा : महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या ६ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीत दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'चारा बँक' सुरू करण्याबाबत घेतलेली भूमिका स्वागतार्ह आहे. सध्याची दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून, नागरिकांना अन्न व पाणी उपलब्ध करून देतानाच पशुधनाचे संरक्षण करणेही अत्यंत महत्त्वाचे आहे. पशुधन ही राष्ट्रीय संपत्ती असून, ते वाचविण्यासाठी चारा बँकेची संकल्पना प्रभावी ठरू शकते, अशी प्रतिक्रिया कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी व्यक्त केली.



दुष्काळाच्या काळात चारा छावण्यांपेक्षा गावागावांत किंवा तालुकास्तरावर चारा बँक उभारून शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार चारा उपलब्ध करून देणे अधिक उपयुक्त ठरू शकते. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागांतर्गत असलेली प्रक्षेत्रे, बीज गुणवत्ता केंद्रे तसेच राज्यातील चारही कृषी विद्यापीठांची विविध संशोधन व विभागीय केंद्रे यांचा उपयोग करता येईल.

या केंद्रांवर उपलब्ध पाण्याच्या स्रोतांचा योग्य वापर करून विविध चारा पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात करावी. त्यातून निर्माण होणारा चारा साठवून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्यास पशुधनाचे संरक्षण करण्यास मोठी मदत होईल. त्यामुळे शासनाने 'चारा बँक' ही संकल्पना केवळ कागदावर न ठेवता तिची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुकानिहाय नियोजन करावे, अशी अपेक्षाही डॉ. ढगे यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!



राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ

संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.

अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर

(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२

www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



संगमनेरकरांनी गौरविलेले

॥जय श्रीराम॥

सुपर शॉपी

निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक

जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर

एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्

प्रोप्रा. अशोक रा. जाधव

फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२

क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा

मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०




# एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला माकप, एसएफआय व किसान सभेचा पाठिंबा



युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता, पारदर्शकतेचा अभाव आणि भरती प्रक्रियेतील अनिश्चिततेविरोधात पुणे येथे सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला माकप, एसएफआय आणि अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. आंदोलनाचा काल पाचवा दिवस होता.

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)चे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या मागण्यांना पाठिंबा व्यक्त केला. यावेळी माकपचे डॉ. महारुद्र डाके, एसएफआयचे राज्य सचिव सोमनाथ निर्मल, अभिषेक शिंदे, एकता सकराते, मोसिन बनकर, कृष्णा रत्काटे, विलास साबळे, अखिल भारतीय किसान सभेचे किसन गुजर आणि विजय पाटील उपस्थित होते.

एमपीएससीच्या कारभारात पारदर्शकता आणावी, पेपरफुटी व परीक्षेतील गैरप्रकारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणारी परीक्षा व भरती प्रक्रियेतील अनिश्चितता दूर करावी, रखडलेल्या भरती प्रक्रिया वेळबद्ध पद्धतीने पूर्ण कराव्यात आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, या मागण्यांसाठी विद्यार्थी आंदोलन करत आहेत.

एसएफआयचे राज्य सचिव सोमनाथ निर्मल यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देताना, सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही तर एसएफआयच्या वतीने राज्यभर आंदोलन उभारले जाईल, असा इशारा दिला. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी एसएफआय राज्यभरातील विद्यार्थी शक्तीला संघटित करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

अखिल भारतीय किसान सभेचे किसन गुजर आणि विजय पाटील यांनीही विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या रोजगाराचा आणि भवितव्याचा प्रश्न हा व्यापक जनतेचा प्रश्न असून, त्यांच्या संघर्षामागे किसान सभा ठामपणे उभी आहे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. अजित नवले म्हणाले की, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी अनेक वर्षे मेहनत, वेळ आणि पैसा खर्च करून आपल्या भवितव्याची तयारी करत असतात. परीक्षा प्रक्रियेतील वारंवार होणारे बदल, पेपरफुटी किंवा अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे शासनाने विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा आणि पारदर्शक, विश्वासार्ह व वेळबद्ध भरती प्रक्रिया सुनिश्चित करावी.

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला माकप, एसएफआय आणि किसान सभा यांचा पाठिंबा कायम राहील, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत गीता परिवाराचा ठसा !

## उपविजेते पदासह सव्वाशे विक्रमी पदकं पटकावली



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सातार्‍यात झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत संगमनेरच्या गीता परिवाराकडून चालवल्या जाणाऱ्या कराटे वर्गातील विद्यार्थ्यांनी सुवर्ण कामगिरीची नोंद करताना उपविजेतेपदाचा बहुमान पटकावला. संगमनेर तसेच पुणे-हडपसर येथील दैनिक कराटे वर्गातील ६४ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेत विविध गटांत एकूण १२६ पदकांची लयलूट केली. यामध्ये ४० सुवर्ण, ३४ रजत आणि ५२ कास्य पदकांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, सातारा, मुंबई, नवी मुंबई, रत्नागिरी, कोल्हापूर, पनवेल आणि तळेगाव दाभाडे येथील सातशेहून अधिक स्पर्धकांचा सहभाग असलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत कुमिते, काता आणि ग्रुप काता या तीन प्रकारांत खेळाडूंनी कौशल्य पणाला लावले. कुमिते म्हणजे प्रत्यक्ष प्रतिस्पर्ध्यासोबतची लढत, तर काता आणि ग्रुप काता या प्रकारांत तंत्र, अचूकता, शिस्त आणि सादरीकरणाला विशेष महत्त्व असते. या तिन्ही प्रकारांत गीता परिवाराच्या खेळाडूंनी सातत्यपूर्ण कामगिरी करत एकामागून एक पदकांची भर घालताना चुरस वाढवली.

काता प्रकारात प्रथमेश त्र्यंबके, मृणाली बागले आणि शिवेंद्र देशमुख यांनी सुवर्णपदक मिळविले. आयुष काचोळे, शिवप्रसाद दिवे, सिद्धेश्वरी आहेर, आदित्य शिंदे, देवांश परदेशी, साईश गवंडी आणि साईराज कडलग यांनी रजतपदकाची कमाई केली. ईश्वरी ढोले, भक्ती ढोले, हर्षल शेलकर, साई औताडे, आनंदी कर्पे, तनुजा जोर्वेकर, आर्या बंगाळ आणि दिव्यांका गलांडे यांनी कांस्यपदक मिळविले.

कुमिते प्रकारातही गीता परिवाराच्या खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला. प्रथमेश त्र्यंबके, आयुष काचोळे, शिवप्रसाद दिवे, प्रिया मंडलिक, सिद्धेश्वरी आहेर, रुद्रा मंतोडे, हर्षल शेलकर, रणबीर गलांडे, देवांश परदेशी, साईश गवंडी, आर्या बंगाळ आणि दिव्यांका गलांडे यांनी सुवर्णपदकावर नाव कोरले. समर्थ जोशी आणि शिवेंद्र देशमुख यांनी रजतपदक मिळविले, तर अन्य खेळाडूंनी कास्यपदकांची भर घातली. ग्रुप काता प्रकारात सिया मंडलिक, ईश्वरी ढोले आणि भक्ती ढोले यांनी रजतपदक मिळवून संघाच्या पदकतालिकेत आणखी भर घातली. या स्पर्धेसाठी सिकंदराबाद येथील इंडिया ओकिनावा स्टाईलचे चीफ मास्टर एस. श्रीनिवासन मुख्य पंच म्हणून उपस्थित होते. सहकाऱ्यांनी स्पर्धेचे संयोजन केले. दत्ता भांदुर्गे, प्रमोद मेहेत्रे, राजेश राहणे, विकास गुंजाळ, आशुतोष गायकवाड, ऋषिकेश कडूस्कर, ओम जोर्वेकर आणि प्रज्ज्वल कानवडे यांनी मुलांना प्रशिक्षण दिले.

गीता परिवाराच्या कराटे वर्गाने मिळवलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ.संजय मालपाणी यांनी अभिनंदन केले आहे.

# नवोदित मतदार नोंदणीला प्राधान्य द्या - सुनील गाढे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- लोकशाही व्यवस्थेत युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून १ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक पात्र युवक-युवतीने मतदार म्हणून आपली नोंदणी करून घ्यावी. नवोदित मतदारांची नोंदणी प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वच महाविद्यालयांनी विशेष पुढाकार घ्यावा, असे आवाहन उप जिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी राहुरी येथील लोक नेते रामदास धुमाळ पाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

राहुरी तालुक्यातील ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित मतदार नोंदणी मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांना मतदार म्हणून नोंदणीची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज भरण्याची प्रक्रिया, मतदार यादीमध्ये नावाची पडताळणी तसेच नवोदित मतदारांनी नोंदणी करताना घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. काही वर्षांपूर्वी आपणही याच महाविद्यालयाचे विद्यार्थी होतो. आज याच महाविद्यालयात अधिकारी म्हणून येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळणे हा विशेष अनुभव आहे, असे सांगत सुनील गाढे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. लोकशाही प्रक्रियेत युवकांची भूमिका आणि जबाबदारी सध्या महत्वाची असून मतदार नोंदणी करणे म्हणजे लोकशाही मजबुतीच्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. त्यामुळे नवीन मतदारांनी मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी स्वतः हून पुढे यावे असे त्यांनी पुढे नमूद केले.

यावेळी उपस्थित पात्र विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक स्वरूपात नमुना क्रमांक ६ भरून घेण्यात आले आणि नवोदित मतदारांच्या नोंदणीचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदार नोंदणीबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. मतदार यादीत नावाची नोंदणी करणे ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून लोकशाहीतील आपल्या सहभागाची पहिली पायरी आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्री नवनाथ दळवी यांनी याप्रसंगी बोलताना नमूद केले. याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले उपजिल्हाधिकारी श्री सुनील गाढे यांचा सत्कार करताना विशेष आनंद होत असल्याची भावना देखील त्यांनी यावेळी बोलून दाखविली.

# स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये जिल्हास्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर येथे ५ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. अहमदनगर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग घेत पोल मल्लखांब आणि रोप मल्लखांब प्रकारांत आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले.





जामखेड, शेवगाव, कोपरगाव, अकोले यांसह विविध तालुक्यांतील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. ताकद, चपळता, संतुलन, लवचिकता आणि आत्मविश्वास यांचा सुरेख मिलाफ साधत खेळाडूंनी सादर केलेल्या कौशल्यपूर्ण कसरतींना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. स्पर्धेस जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे आणि क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी स्पर्धेचे निरीक्षण करून खेळाडूंना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले. यावेळी अहमदनगर मल्लखांब जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नंदेश शिंदे, उपाध्यक्ष अनंत रीसे, उपाध्यक्ष दिलीप झोळेकर, सचिव निलेश कुलकर्णी, खजिनदार अमित जिनसीवाले आणि सहसचिव मोहनीराज लहाडे उपस्थित होते.

शाळेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. संज्योत वैद्य यांनी सहभागी खेळाडूंच्या मेहनतीचे आणि सादरीकरणाचे कौतुक केले. मल्लखांबासारख्या पारंपरिक भारतीय खेळाला शालेय स्तरावर प्रोत्साहन मिळणे महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण सराव आणि जिद्दीच्या जोरावर पुढील स्तरावरील स्पर्धांमध्येही उल्लेखनीय कामगिरी करावी, अशा शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी क्रीडा विभाग, प्रशिक्षक आणि शिक्षकवृंदाचे अभिनंदन केले. शाळेचे प्राचार्य रमेश दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात क्रीडेला महत्त्वाचे स्थान असून, मल्लखांबाच्या नियमित सरावातून शारीरिक क्षमता आणि आत्मविश्वासासोबतच शिस्त व साहसाचे संस्कार होतात, असे त्यांनी सांगितले. स्पर्धेचे नियोजन आणि समन्वय शाळेचे मल्लखांब प्रशिक्षक प्रतीक डावखरे यांनी केले. स्पर्धेपूर्व तयारीपासून प्रत्यक्ष आयोजनापर्यंत त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे स्पर्धा शिस्तबद्ध आणि सुरळीतपणे पार पडली.

मल्लखांब हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला पारंपरिक भारतीय खेळ असून, अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्याला व्यापक व्यासपीठ मिळते. तसेच त्यांच्यातील क्रीडागुणांना चालना मिळून उच्चस्तरीय स्पर्धांसाठी आवश्यक आत्मविश्वास आणि अनुभव निर्माण होतो. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे व्यवस्थापन, डॉ. संज्योत वैद्य, प्राचार्य रमेश दिघे, क्रीडा विभाग, प्रशिक्षक प्रतीक डावखरे, शिक्षकवृंद आणि अहमदनगर मल्लखांब जिल्हा संघटनेचे पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले.

# श्री श्री रविशंकर विद्यामंदिर व क्रिकेट अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सुमेरू एज्युकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, संगमनेरची विद्यार्थिनी व श्री श्री क्रिकेट अकॅडमीची खेळाडू आदिती राऊत हिची महाराष्ट्राच्या महिला U-19 क्रिकेट संघात दिमाखदार निवड झाली आहे. तिच्या या यशाने संगमनेरच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, शाळा व अकॅडमीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. आदितीने यापूर्वी महाराष्ट्राच्या ण-१५ आणि ण-१७ वयोगटांत उत्कृष्ट कामगिरी करत राज्याचे प्रतिनिधित्व केले असून आता U-19 संघात स्थान मिळवत तिने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप पाडली आहे. लहान वयापासूनच क्रिकेटची आवड जपणारी आदिती कठोर सराव, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर राज्यस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे.

आदितीच्या या दिमाखदार यशामागे श्री श्री रविशंकर विद्यामंदिर या शाळेचे मोलाचे योगदान आहे. केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांमधील क्रीडा आणि इतर सुप्त गुणांना वाव देणे हे शाळेचे प्रमुख धोरण राहिले आहे. खेळाडू विद्यार्थ्यांना सरावासाठी वेळेचे लवचिक नियोजन अभ्यासाचे नियोजन आणि विशेष मार्गदर्शन पुरवून शाळा त्यांच्या क्रीडाप्रवासात खंबीरपणे पाठीशी उभी राहते.



त्याचप्रमाणे आदितीच्या कौशल्याला खऱ्या अर्थाने पैलू पाडण्याचे काम श्री श्री क्रिकेट अकॅडमी, संगमनेरने केले आहे. अकॅडमीमध्ये खेळाडूंसाठी उत्कृष्ट टर्फ विकेट्स, आधुनिक नेट प्रॅक्टिस, व्हिडिओ नालिसिस आणि आधुनिक फिटनेस साहित्य अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. येथे दररोज सकाळी आणि संध्याकाळी तासनतास कठोर सराव करून घेतला जातो. खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेसोबतच फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील तांत्रिक चुका बारकाईने शोधून त्या दुरुस्त करण्यावर भर दिला जातो. प्रत्यक्ष सामने आणि सामन्यातील विविध प्रसंगांचा सराव करून घेत खेळाडूंमध्ये कठीण परिस्थिती हाताळण्याची क्षमता निर्माण केली जाते. अकॅडमीच्या याच शिस्तबद्ध आणि उच्च दर्जाच्या प्रशिक्षण पद्धतीमुळे आदितीचा खेळ अधिक परिपक्व झाला.

BCCI आयोजित महिला U-19 T20 ट्रॉफी (२०२६-२७) स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर झाला असून हा संघ एश्रळींश 'ए' गटात सहभागी होणार आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील सामने तिरुवनंतपुरम येथे रंगणार आहेत. या प्रवासात मुख्य प्रशिक्षक योगेश खरात यांच्यासह सहाय्यक प्रशिक्षक अदीप वाघ, प्रथमेश हासे आणि अभिषेक कदम यांनी तिच्यावर घेतलेली मेहनत अत्यंत मोलाची ठरली आहे. तसेच परभणी क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष संतोष बोबडे आणि सुहास पावडे यांचेही मोलाचे व वेळोवेळी मार्गदर्शन लाभल्याने आदितीच्या क्रीडा वाटचालीला मोठे पाठबळ मिळाले.

आदितीच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल संस्थापिका स्वाती शाह, सेक्रेटरी समीर शाह, प्राचार्या आरती सप्रा, उपप्राचार्या ज्योतिर्मया चव्हाण तसेच शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे मनापासून कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. जयश्रीताई थोरात यांनी मुंबईत आदिवासी विद्यार्थ्यांच्या "उलगुलान" मोर्चाला दिला पाठिंबा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आपल्या विविध मागण्यांसाठी ४० दिवसांहून अधिक काळ आंदोलन करूनही अपेक्षित दखल न घेतल्याने नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांनी २८ सप्टेंबर पासून मुंबईच्या दिशेने उलगुलान हा मोर्चा सुरू केला आहे .सरकारने या विद्यार्थ्यांची दखल न घेता दडपशाही करून त्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला आहे. याचा निषेध करत या आदिवासी विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्या तातडीने मंजूर करा अशी आग्रही मागणी संगमनेर तालुका युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केली असून त्यांनी मुंबईमध्ये या विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला. मुंबई येथे आदिवासी विद्यार्थ्यांच्या उलगुलान मोर्चासाठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची अत्यंत आस्तेवाईकपणे चौकशी करत या विद्यार्थ्यांना डॉ जयश्रीताई थोरात यांनी पाठिंबा दिला. याचबरोबर सरकारने विद्यार्थ्यांबाबत घेतलेल्या दडपशाहीच्या भूमिकेचा त्यांनी निषेध केला.



यावेळी डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, आदिवासी विभागाच्या विविध प्रलंबित मागण्यासाठी ४० दिवसांपेक्षा अधिक काळ या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. मात्र सरकारने याकडे दुर्लक्ष केले म्हणून आपल्या मागण्यांसाठी हे विद्यार्थी १७० किलोमीटरची पायपीट करून मुंबईमध्ये पोहोचले. तरीही त्यांची कोणतीही दखल घेतली नाही। उलट ते रात्री कॉंग्रेस कार्यालयात झोपले असताना मध्यरात्री त्यांना दडपशाही करून अटक करण्याचा प्रयत्न करण्यात आला हे अत्यंत निंदनीय आहे. आदिवासी आश्रम शाळा व वस्तीगृहांमधील शिक्षण व्यवस्था, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अपुरा सुविधा, भोजन व्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंबंधित विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधणे हा या आंदोलनाचा उद्देश आहे.

## संपादकीय...

# संकटाच्या काळात संवेदनशील प्रशासनाची खरी कसोटी

एखाद्या राज्याची, शहराची किंवा गावाची खरी ताकद केवळ मोठ्या इमारती, रुंद रस्ते, आकर्षक प्रकल्प आणि विकासाच्या आकडेवारीत दिसत नाही. संकटाच्या काळात सामान्य नागरिकाच्या पाठीशी प्रशासन किती ठामपणे उभे राहते, यावर त्या व्यवस्थेची खरी गुणवत्ता ठरते. दुष्काळ असो, अतिवृष्टी असो, पूरस्थिती असो, महागाई असो, बेरोजगारी असो किंवा एखादी अचानक उद्भवलेली आपत्ती असो; अशा प्रत्येक वेळी प्रशासनाची कार्यक्षमता आणि संवेदनशीलता यांची कसोटी लागते. संकटाच्या काळात केवळ आदेश काढून किंवा बैठका घेऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. त्या आदेशांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो का, हे अधिक महत्त्वाचे असते. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात नैसर्गिक संकटांचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्यांवर होतो. पाऊस कमी पडला तर दुष्काळ, अतिवृष्टी झाली तर पिकांचे नुकसान, पिकांना योग्य भाव मिळाला नाही तर आर्थिक संकट आणि उत्पादन खर्च वाढला तर कर्जाचा बोजा, अशा अनेक संकटांच्या चक्रात शेतकरी अडकलेला आहे. अशा वेळी प्रशासनाने केवळ पंचनामे करून आकडे गोळा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेणे गरजेचे आहे. कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन अर्ज, विविध प्रमाणपत्रे आणि तांत्रिक अटी यामुळे संकटग्रस्त नागरिकाला मदत मिळण्यात विलंब होत असेल, तर त्या प्रक्रियेचा पुनर्विचार करणे हीच संवेदनशील प्रशासनाची खरी ओळख आहे. संकटाच्या काळात 'नियम' महत्त्वाचे असतातच; मात्र नियमांचा उद्देश माणसाला मदत करणे हा असतो, अडवणूक करणे नव्हे. एखाद्या शेतकऱ्याचे पीक डोळ्यांसमोर जळालेले असताना त्याच्याकडून मदतीसाठी असंख्य कागदपत्रांची मागणी करणे किंवा एका छोट्या त्रुटीमुळे त्याचा अर्ज नाकारणे हे प्रशासनाच्या मानवी चेहऱ्याला शोभणारे नाही. नियमांमध्ये राहूनही मदत करण्याचे अनेक मार्ग प्रशासनाकडे असतात. त्यासाठी अधिकाऱ्यांमध्ये निर्णयक्षमता आणि संवेदनशीलता असणे आवश्यक आहे. पूर, अतिवृष्टी किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी प्रशासनाची भूमिका आणखी महत्त्वाची ठरते. रस्ते बंद होणे, वीजपुरवठा खंडित होणे, पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होणे, घरांचे नुकसान होणे अशा परिस्थितीत नागरिकांना तातडीची मदत मिळणे अपेक्षित असते. अशा वेळी नियंत्रण कक्ष, मदत पथके, आरोग्य सेवा, अन्न-पाणी आणि सुरक्षित निवारा यांची व्यवस्था वेगाने झाली पाहिजे. संकटग्रस्त भागात अधिकारी प्रत्यक्ष पोहोचले तर नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढतो. कार्यालयात बसून परिस्थितीचे आकलन करण्यापेक्षा प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन समस्या समजून घेणे अधिक परिणामकारक ठरते. संवेदनशील प्रशासनाचा अर्थ प्रत्येक मागणी मान्य करणे असा नाही. उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करून सर्वाधिक गरजू व्यक्तीपर्यंत मदत पोहोचवणे हा त्याचा अर्थ आहे. संकटाच्या काळात समाजातील दुर्बल घटक सर्वाधिक प्रभावित होतात. गरीब कुटुंबे, शेतमजूर, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी विशेष व्यवस्था करणे आवश्यक आहे. मदत वाटपात पारदर्शकता आणि समानता राखली नाही, तर संकटापेक्षा व्यवस्थेतील असमानता अधिक वेदनादायक ठरते. आजच्या काळात प्रशासनासमोर आणखी एक मोठे आव्हान म्हणजे माहितीचा वेग. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे अफवा काही मिनिटांत पसरतात. त्यामुळे संकटाच्या काळात प्रशासनाने अचूक आणि अधिकृत माहिती नागरिकांपर्यंत वेळेवर पोहोचवणे गरजेचे आहे. चुकीची माहिती पसरल्यानंतर स्पष्टीकरण देण्यापेक्षा आधीच स्पष्ट संवाद साधणे अधिक योग्य ठरेल. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद जितका पारदर्शक असेल, तितका गैरसमज कमी होईल. संकटाच्या काळात राजकीय नेतृत्व आणि प्रशासन यांच्यातील समन्वयही महत्त्वाचा असतो. लोकप्रतिनिधींनी समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवाव्यात आणि प्रशासनाने त्यावर तातडीने कार्यवाही करावी. मात्र मदत किंवा विकासकामे करताना राजकीय भेदभावाला स्थान मिळता कामा नये. संकटाला पक्ष नसतो, जात नसते, धर्म नसतो. त्यामुळे मदतही कोणताही भेदभाव न करता गरजू नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. संकट हे केवळ अडचणीचे पर्व नसते; ते व्यवस्थेतील त्रुटी ओळखण्याची संधीही असते. एखाद्या आपत्तीनंतर फक्त नुकसानभरपाई देऊन विषय संपवण्याऐवजी भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. पाणीटंचाई असेल तर जलसंधारण, पूरस्थिती असेल तर नाले आणि नदीपात्रांचे नियोजन, वाहतूक कोंडी असेल तर सक्षम वाहतूक आराखडा आणि बेरोजगारी असेल तर स्थानिक रोजगारनिर्मिती याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

# पर्यटन हे बहुआयामी आर्थिक क्षेत्र असून रोजगारनिर्मितीची मोठी क्षमता – प्रा. डॉ. चकोर

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - त्र्यंबकेश्वर येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जागतिक पर्यटन दिनानिमित्त आयोजित पर्यटन व्यवसायातील रोजगाराची संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते प्रमुख व्याख्याते म्हणून व्ही एन नाईक महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. बाळासाहेब चकोर हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमनाथ घुले हे होते प्रमुख पाहुण्यांचा परिचय व स्वागत अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापिका डॉ. सुलक्षणा कोळी यांनी केले.



आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रा. डॉ. चकोर असे म्हणाले की, पर्यटन हे केवळ प्रवास व मनोरंजनाचे क्षेत्र नसून देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे योगदान देणारे आणि कोट्यवधी रोजगारनिर्मितीची क्षमता असलेले बहुआयामी आर्थिक क्षेत्र आहे. पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून हॉटेल व्यवसाय, वाहतूक, पर्यटन मार्गदर्शन, हस्तकला, स्थानिक खाद्यव्यवसाय, कृषी व ग्रामीण पर्यटन तसेच विविध सेवा क्षेत्रांमध्ये रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतात. पर्यटन क्षेत्रातील बदलत्या रोजगाराच्या संधी, व्यवसायाच्या नव्या दिशा आणि पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक विकासाला मिळणारी चालना याविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले.तेव्हा युवकांनी पर्यटन क्षेत्रातील रोजगाराच्या पारंपरिक संधींबरोबरच डिजिटल तंत्रज्ञान, सोशल मीडिया, ऑनलाइन बुकिंग, पर्यटन विपणन आणि पर्यटन-आधारित स्टार्टअप यांचा वापर करून स्वयंरोजगाराच्या नवीन संधी निर्माण कराव्यात, असे आवाहन प्रा. डॉ. चकोर यांनी केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सोमनाथ घुले असे म्हणाले की, पर्यटन क्षेत्रामध्ये हॉटेल व्यवसाय, ट्रॅव्हल एजन्सी, टूर ऑपरेटर, पर्यटन मार्गदर्शक, प्रवास व वाहतूक सेवा, साहसी पर्यटन, ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन, वारसा पर्यटन, इव्हेंट मॅनेजमेंट, पर्यटन छायाचित्रण, डिजिटल पर्यटन आणि पर्यटन विपणन अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत, असे त्यांनी सांगितले.

पर्यटनामुळे स्थानिक पातळीवर उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण होतात. स्थानिक हस्तकला, खाद्यपदार्थ, कृषी उत्पादने, लघुउद्योग, वाहतूक व निवासव्यवस्थेला बाजारपेठ उपलब्ध होते. त्यामुळे पर्यटनाचा विकास हा केवळ पर्यटकांच्या संख्येत वाढ करण्यापुरता मर्यादित नसून त्याचा संबंध स्थानिक आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती आणि उद्योजकतेशी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास डॉ. विठ्ठल सोनवणे , डॉ. समाधान गांगुर्डे, डॉ अजित नगरकर, इतर प्राध्यापक ,श्री दिपक मेढे, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिलीप भेरे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. विष्णू दिघे यांनी केले

# पुण्यात महाज्योतीच्या परीक्षेत मोठा गोंधळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे - महाज्योतीच्या स्कॉलरशिप परीक्षेदरम्यान पुण्यातील आंबेगाव बुद्रुक परिसरातील सन ब्राईट स्कूल परीक्षा केंद्रावर मोठा गोंधळ झाल्याचे समोर आले आहे. परीक्षा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थिनींच्या म्हणण्यानुसार, परीक्षा केंद्रावर संगणक उपलब्ध नसल्याने त्यांना परीक्षा देता आली नाही. सकाळी ९ ते ११ या वेळेत परीक्षा नियोजित असतानाही दोन तासांपर्यंत विद्यार्थिनी परीक्षा केंद्राबाहेरच थांबल्या होत्या. अखेर परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दोन तास विद्यार्थिनी परीक्षा केंद्राबाहेर

महाज्योतीची स्कॉलरशिप परीक्षा आज नियोजित वेळेनुसार घेण्यात येणार होती. त्यासाठी विद्यार्थिनी संबंधित परीक्षा केंद्रावर वेळेत दाखल झाल्या. मात्र, केंद्रावर परीक्षा घेण्यासाठी आवश्यक संगणक उपलब्ध नसल्याचा दावा विद्यार्थिनींनी केला. त्यामुळे परीक्षा सुरू होण्याच्या वेळेनंतरही प्रत्यक्ष परीक्षा सुरू झाली नाही. दोन तास प्रतीक्षा केल्यानंतरही परीक्षा देता न आल्याने विद्यार्थिनींमध्ये नाराजी निर्माण झाली.परीक्षेची वेळ सकाळी ९ ते ११ अशी असताना विद्यार्थिनींना बराच वेळ परीक्षा केंद्राबाहेर थांबावे लागले. त्यानंतर अखेर परीक्षा रद्द करण्यात आली. परीक्षा देण्यासाठी तयारी करून आलेल्या विद्यार्थिनींना केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने परीक्षा देता आली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकारामुळे विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांमध्येही नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

आंबेगाव येथील महाज्योतीच्या परीक्षा केंद्रावर तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देताना त्रास झाल्याच्या प्रकरणावर विजय वडेट्टीवार यांनी भूमिका मांडली आहे. त्यांनी महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. नारिंगे यांच्याशी फोनवरून चर्चा करून विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळावी, अशी मागणी केली. विद्यार्थ्यांची कोणतीही चूक नसताना तांत्रिक गोंधळाचा फटका त्यांच्या भवितव्याला बसू नये, यासाठी आंबेगाव केंद्रावरील परीक्षा रद्द करून त्याच केंद्रावर पुन्हा परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. महाज्योतीनेही परीक्षा पुन्हा घेण्याचे स्पष्ट केल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. 'गोंधळ व्यवस्थेचा, नुकसान विद्यार्थ्यांचे, हे अजिबात चालणार नाही,' असे म्हणत विद्यार्थ्यांच्या मेहनतीला न्याय मिळावा आणि सर्वांना समान व निष्पक्ष संधी मिळावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## पान - १ वरून जिल्हा बँकेच्या...

मात्र, जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील विखे-थोरात यांचे राजकीय वर्चस्व आणि निवडणुकीतील बदलती समीकरणे पाहता विरोधकांची रणनीती अडचणीत आल्याचे चित्र आहे. राम शिंदे यांनीही निवडणुकीतून माघार घेतल्याने विरोधकांना मोठा धक्का बसला आहे.

माघारीनंतर चित्र होणार स्पष्ट

जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी विक्रमी ३६९ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननीनंतर आता माघारीची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. माघारीनंतर किती जागांवर प्रत्यक्ष निवडणूक होणार आणि किती जागा बिनविरोध होणार, याचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.

मात्र, संचालक मंडळाच्या निवडणुकीपेक्षा आता जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी कोणते राजकीय समीकरण आकार घेते, याची उत्सुकता वाढली आहे. विखे-थोरात-गडाख यांच्यातील संभाव्य समन्वय, विरोधकांची भूमिका आणि संचालकांची संख्या यावर अध्यक्षपदाचे गणित अवलंबून राहणार आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठीची चुरस आता अधिक रंगण्याची शक्यता आहे.


## महारष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता**

**कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी ता. कर्जत जि.अहिल्यानगर.पिन कोड ४१४४०२**

**ई मेल पत्ता** -kdcdkolwadi.engineer83@gmail.com

**ई निविदा सूचना क्र. १७ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता. कुकडी वितरण बांधकाम विभाग,कोळवडी ता. कर्जत जि.अहिल्यानगर, पिन कोड-४१४४०२ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकरांकडून खालील कामकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे ऑनलाईन निविदा मार्गावर आहेत. निविदा कागदत्रे शासनाचे संकेतस्थळ येथून डाउनलोड करण्यात यावीत, सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यलयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी ता. कर्जत जि.अहिल्यानगर, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास संकेतस्थळवर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये | ठेविदार पात्रता |
|---|---|---|---|---|
| .१ | येसवडी शाखा कालव्याची उजवी लघुवितरीका क्र.९ ते १३ व पिंपळवाडी वितरीका वरील डावी लघुवितरीका क्र.४,६ ते ७ मधील विमोचक व थेट विमोचकाची दुरुस्ती करणे, | अहिल्यानगर | २७,४८,५२८/- | सार्वजनिक बांधकाम नोंदणीकृत अहिल्यानगर जिल्ह्यातील सुशिक्षीत बेरोजगार अभियंते |

निविदा उपलब्ध कालावधी- दिनांक-०७/१०/२०२६ ते दिनांक-१४/१०/२०२६
निविदा उघडण्याचा दिनांक-१६/१०/२०२६

जा. क्र कुविबांवि/लेशा-२/३९५४/सन-२०२६
कार्यकारी अभियंता याचे कार्यलय,
कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी
दिनांक-०१/१०/२०२६

कार्यकारी अभियंता
कुकडी वितरण बांधकाम विभाग
कोळवडी ता.कर्जत जि.अहिल्यानगर

जिमाका/नगर/जाहि/१३२/२०२६


# विजय दारोळे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील इंदिरानगर येथे राहणारे विजय धोंडीराम दारोळे यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी दुपारी निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

स्व. विजय दारोळे यांच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने स्व. विजय दारोळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.


**पाहिजेत**

रिसेप्शनिस्ट- १
(स्त्री / पुरूष)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**

युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर
कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७१२७२,९३७०७७३५०४




**पाहिजेत**

ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
( सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**

सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य )
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ अॅण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

**पाहिजेत**

डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

**20 गुंठे जागा भाडे तत्त्वावर देणे आहे**

नूतन माध्यमिक विद्यालया पुढे, राजापूर, तालुका- संगमनेर. जिल्हा अहिल्यानगर.
7798616908







**पाहिजेत**

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा भरणे आहे**

ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431

**पाहिजेत**

नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरपिस्ट
पुरूष–१/ स्त्री –१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

**पाहिजेत**

दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

# न्या. सुनील शुक्रे यांनी लोकायुक्त अध्यक्षपदाची घेतली शपथ



फोटो - पराग कुलकर्णी

मुंबई (पराग कुलकर्णी)

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी महाराष्ट्राच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. लोकभवन, मुंबई येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मावळते लोकायुक्त न्या. विद्यासागर कानडे, मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि लोकायुक्त संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

# संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा; शास्त्रज्ञ शिंदेंना 'भारत विभूषण'

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात देशाचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल करणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आर. एस. शिंदे यांना नवी दिल्ली येथील 'नॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'तर्फे प्रतिष्ठेचा 'भारत विभूषण २०२६' हा सन्मान प्रदान करण्यात आला. आर. एस. शिंदे हे संगमनेर तालुक्यातील मनोली गावचे सुपुत्र असून, भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'हायपरलूप मॅग्लेव्ह' (चुंबकीय रेल्वे) प्रकल्पासह अणुऊर्जा विभागात ते महत्त्वाची जबाबदारी सांभाळत आहेत.

'आत्मनिर्भर भारत २०४७' या राष्ट्रीय संकल्पनेअंतर्गत देशाच्या विकासात आणि संशोधन क्षेत्रात असाधारण योगदान देणाऱ्या शास्त्रज्ञांचा गौरव करण्यासाठी या पुरस्काराची निवड केली जाते. इस्त्रो आणि संरक्षण क्षेत्रातील माजी उच्चपदस्थ अधिकारी तसेच आयआयटीमधील तज्ज्ञांचा समावेश असलेल्या उच्चस्तरीय निवड समितीने आर. एस. शिंदे यांच्या नावाची या पुरस्कारासाठी शिफारस केली होती.



ज्येष्ठ शास्त्रज्ञ आर. एस. शिंदे यांनी भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असताना त्यांच्यासोबत प्रत्यक्ष संशोधन कार्यात सहभाग घेतला होता. त्यांच्या या प्रदीर्घ अनुभवाचा देशाच्या संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठा लाभ झाला आहे. तसेच 'इंडो-युरोप मॅग्लेव्ह बोर्ड'च्या आंतरराष्ट्रीय करारांतर्गत हायपरलूप प्रकल्पासाठी नेदरलँड्स, स्वित्झर्लंड आणि फ्रान्स या युरोपीय देशांमध्ये त्यांनी भारत सरकारचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून यशस्वीपणे काम केले.

शास्त्रज्ञ आर. एस. शिंदे सध्या 'स्वदेशी चुंबकीय तंत्रज्ञान' अर्थात हवेत धावणाऱ्या मॅग्लेव्ह रेल्वेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर मुख्य संशोधक म्हणून कार्यरत आहेत. या हायपरलूप मॅग्लेव्ह प्रकल्पाची पहिली यशस्वी चाचणी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत पार पडली आहे. रेल्वे वाहतुकीसोबतच भारतीय संरक्षण व्यवस्था, अंतराळ संशोधन, वैद्यकीय उपकरणे आणि अवजड उद्योगांसाठी आवश्यक अत्याधुनिक चुंबकीय तंत्रज्ञानाच्या स्वदेशी विकासातही शिंदे यांचे मोलाचे योगदान आहे. देशाच्या संरक्षण आणि अत्याधुनिक वाहतूक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या आर. एस. शिंदे यांना 'भारत विभूषण २०२६' हा सन्मान मिळाल्याने त्यांच्या मूळ मनोली गावासह संगमनेर तालुका आणि जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# राज्यपालांच्या हस्ते संत रविदास आणि अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन कार्यावरील पाच पुस्तकांचे प्रकाशन



फोटो - पराग कुलकर्णी, मुंबई

मुंबई (पराग कुलकर्णी)

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते संत रविदास आणि साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर आधारित ५ पुस्तकांचे प्रकाशन सोमवारी (दि. ५ ऑक्टो.) लोकभवन येथे निवडक निमंत्रितांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

राज्यपालांच्या हस्ते तहसीलदार स्नेहलता स्वामी (बिंदू) लिखित 'संत रविदास म्हणे' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. राज्यपालांच्या हस्ते मातंग साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. धनाजी ऊर्फ धनंजय सोमनाथ भिसे संपादित 'अण्णा भाऊ साठे : साहित्यविचार, संशोधन आणि चिंतन', 'अण्णाभाऊ साठे : आकलन आणि आस्वाद' व 'अण्णा भाऊ साठे : अवधारणा और जागरण' (हिंदी) या तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. याशिवाय डॉ बळीराम गायकवाड, डॉ माणिक सोनावणे व डॉ धनाजी ऊर्फ धनंजय सोमनाथ भिसे यांनी संपादित केलेल्या 'अण्णाभाऊ साठे : अ ट्रान्सनॅशनल लिटररी लेगसी' या इंग्रजी पुस्तकाचे देखील प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना राज्यपालांनी लिखाण हा समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा महत्त्वाचा मार्ग असल्याचे सांगितले. महान व्यक्तींवरील लिखाणाच्या माध्यमातून त्यांचे विचार व मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य होते असे राज्यपालांनी सांगितले. साहित्याचा अंतिम उद्देश समाजात एकोपा निर्माण करणे आणि जीवन उन्नत करणे हा आहे. भारतातील संत परंपरा ही समानतेची चळवळ होती. मात्र, या चळवळीच्या योगदानाची इतिहासात पुरेशी नोंद झालेली नाही असे राज्यपालांनी सांगितले.

साहित्य विविध भाषा आणि पिढ्यांना जोडण्याचे कार्य करते, असे सांगून राज्यपाल म्हणाले की, काळाच्या ओघात लोक चित्रपट कलाकार आणि राजकारण्यांना विसरतील; परंतु महान लेखक आणि कवींना विसरत नाहीत. कालिदास, मुन्शी प्रेमचंद आणि शेक्सपिअर यांच्या साहित्यकृती आजही जिवंत आहेत, कारण उत्तम लेखन मन आणि हृदय या दोन्हींना स्पर्श करते, असे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्राला समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. चांगल्या साहित्याचा आजही समाजाकडून आदर केला जातो असे सांगताना राज्यपालांनी फुलांऐवजी पुस्तके भेट द्यावेत असे आवाहन केले. फुले कोमेजून जातात; मात्र एखादे पुस्तक कुणीतरी, कुठेतरी आणि कधीही वाचू शकते. त्या पुस्तकातील दोन पाने जरी वाचली, तरी त्याचा वाचकाच्या विचारांवर परिणाम होऊ शकतो, असे राज्यपालांनी सांगितले.

लेखन हे लेखकांच्या विचारांना आणि कल्पनांना पंख देण्याचे कार्य करते. त्यामध्ये प्रेरणा देण्याची आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती आहे. त्यामुळे लेखन आणि लेखकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच आपला समृद्ध साहित्यिक वारसा जतन करून तो भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविला पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

पुस्तक प्रकाशन सोहळ्याला पद्मश्री रमेश पतंगे, पद्मश्री गिरीश प्रभुणे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रवींद्र कुलकर्णी, विष्णु वझे, आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे, आदी उपस्थित होते.

# संगमनेरच्या भावी पोलीस योद्ध्यांसाठी 'मिशन खाकी'

## संगमनेरमधील पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये जनजागृती

संगमनेर- शहर आणि तालुक्यात पोलीस दलात भरती होऊन देशसेवा करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या गरीब, गरजू व होतकरू युवक-युवतींना योग्य दिशा व आवश्यक सहाय्य मिळावे, यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली 'मिशन खाकी पोलीस भरती योद्धा सहाय्यता अभियान' सुरू करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून शहरातील विविध पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत २ ऑक्टोबर रोजी अभियानाचा शुभारंभ झाला. पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, योग्य मार्गदर्शनाचा अभाव, अर्ज प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी, कागदपत्रे तसेच अभ्यासाचे नियोजन यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. या विद्यार्थ्यांना आवश्यक मदत व मार्गदर्शन देण्याचा प्रयत्न 'मिशन खाकी'च्या माध्यमातून करण्यात येत आहे.

विनोद सूर्यवंशी, सौरभ देशमुख, अभिजीत पुंड, शशांक नामन, कृष्णा हासे, राहुल भोईर, सनी धारणकर, विशाल जोशी, मयूर म्हसे, कृष्णा गांडोळे व अनिकेत चांगले यांनी शहरातील विविध पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रांना भेटी देऊन अभियानाची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना उपलब्ध सहाय्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अडचणी असल्यास 'मिशन खाकी'च्या लिंकवर माहिती पाठविण्याचे आवाहन करण्यात आले.

आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही गरीब, शेतकरी किंवा कष्टकरी कुटुंबातील मुला-मुलीचे पोलीस होण्याचे स्वप्न अपूर्ण राहू नये, हा अभियानाचा उद्देश आहे. अर्ज, कागदपत्रे आणि अभ्यासाच्या नियोजनासाठी आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पोलीस भरतीचे वेळापत्रक लवकरच जाहीर होण्याची शक्यता असल्याने इच्छुक युवक-युवतींनी तयारीला वेग द्यावा. मैदानावर घाम गाळण्याची जिद्द तुमची असेल, तर आवश्यक मदत देण्याची जबाबदारी आमची असेल, असे आवाहन कार्यकर्त्यांनी केले.

## दिनविशेष

२००१: अफगाणिस्तान हल्ला — सप्टेंबर ११ च्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने अफगाणिस्तानवर हल्ला चढवला.

१९९६: फॉक्स न्यूज चॅनल — प्रसारण सुरू होते.

१९८७: खलिस्तान — शीख राष्ट्रवादीं लोकांनी भारतापासून खलिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली, त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता नाही.

१९७७: सोव्हिएत युनियन — चौथी राज्यघटना स्वीकारली गेली.

१९७१: संयुक्त राष्ट्र — ओमान देशाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९१९: नवजीवन — महात्मा गांधींनी नवजीवन हे वृत्तपत्र सुरू केले.

१९५९: प्रोब लुना 3 — सोव्हिएत अंतराळयानाने चंद्राच्या दूरच्या बाजूची पहिली छायाचित्रे प्रसारित केली.

१९५०: मिशनरीज ऑफ चॅरिटी — मदर तेरेसा यांनी संस्थेची स्थापना केली.

१९४९: जर्मन डेमॉक्रेटिक रिपब्लिक (पूर्व जर्मनी) — स्थापना.

## जन्म

१९७३: ग्रिगोल मॅगलोब्लिशविली — जॉर्जिया देशाचे ७वे पंतप्रधान

१९६०: आश्विनी भिडे-देशपांडे — शास्त्रीय गायिका

१९५९: शमौन कोवेल — एक्स फैक्टर आणि ब्रिटन गॉट टेलेन्टचे निर्माते

१९५२: व्लादिमीर पुतिन — रशियाचे ४थे राष्ट्राध्यक्ष

१९४४: डोनाल्ड त्सांग — चीनी नागरी सेवक आणि राजकारणी, हाँगकाँगचे २रे मुख्य कार्यकारी

१९७८: जहीर खान — भारतीय माजी क्रिकेटपटू, डावखुरा वेगवान गोलंदाज म्हणून भारतीय संघासाठी दीर्घकाळ प्रभावी कामगिरी — पद्मश्री, अर्जुन पुरस्का

१९३४: उल्रिक मेनहॉफ — जर्मन अत्यंत डावे दहशतवादी, रेड आर्मी गटाचे सहसंस्थापक, पत्रकार (निधन: ९ मे १९७६ )

१९३१: आर. शिवगुरुनाथन — श्रीलंकन पत्रकार, वकील आणि शैक्षणिक (निधन: ९ ऑगस्ट २००३ )१९३१: डेसमंड टुटू — दक्षिण आफ्रिकेचे मुख्य बिशप आणि कार्यकर्ते —

## मृत्यू

२०२२: अरुण बाली — भारतीय अभिनेते (जन्म: २३ डिसेंबर १९४२ )

२०१५: जुरेलांग झेडकिया — मार्शल बेटांचे ५वे अध्यक्ष (जन्म: १३ जुलै १९५० )

२०११: रमीझ अलिया — अल्बेनिया देशाचे पहिले अध्यक्ष (जन्म: १८ ऑक्टोबर १९२५ )

२०१०: मिल्का प्लानिंक — युगोस्लाव्हिया देशाचे ७वे पंतप्रधान (जन्म: २१ नोव्हेंबर १९२४ )

१९९९: डेव्हिड ए. हफमन — अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ, हफमन कोडिंग विकसित केले (जन्म: ९ ऑगस्ट १९२५ )

१९९९: उमाकांत ठोमरे — साहित्यिक आणि वीणा मासिकाचे संपादक (जन्म: १५ ऑगस्ट १९२९)

१९९८: भाऊसाहेब वर्तक — भारतीय राजकारणी व नेते — पद्मश्री

१९९२: बाबू करम सिंग बल — भारतीय उद्योगपती आणि राजकारणी (जन्म: १९२७ )

१९७५: डी. व्ही. जी. — कन्नड कवी व विचारवंत (जन्म: १८ जानेवारी १८८९ )

०९५१: क्सिओ — चायनीज खितान सम्राज्ञी डोजर

०९५१: झेन — चीनी खितान सम्राज्ञी पत्नी

०९५१: शी झोन्ग — लियाओ राजवंशाचा सम्राट (जन्म: २९ जानेवारी ०९१९ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०७ ऑक्टोबर**

# १९१९: महात्मा गांधींनी नवजीवन हे वृत्तपत्र सुरू केले.

१९१९ : 'नवजीवन' हे महात्मा गांधींनी सुरू केलेले गुजराती भाषेतील प्रसिद्ध साप्ताहिक वृत्तपत्र होते. त्याचा पहिला अंक ७ सप्टेंबर १९१९ रोजी प्रकाशित झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात जनजागृती आणि राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी 'नवजीवन'ने महत्त्वाची भूमिका बजावली.महात्मा गांधींना पत्रकारितेचे महत्त्व चांगलेच माहीत होते. सामान्य जनतेपर्यंत आपले विचार थेट पोहोचवण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रांचा प्रभावीपणे वापर केला. 'नवजीवन'च्या माध्यमातून त्यांनी स्वराज्य, सत्य, अहिंसा, स्वदेशी, खादी, सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रीय एकता यांसारख्या विषयांवर लेखन केले.१९१९ हे वर्ष भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. ब्रिटिश सरकारने लागू केलेल्या रॉलेट कायद्यामुळे देशभर असंतोष निर्माण झाला होता. त्याच काळात पंजाबमधील जालियनवाला बाग हत्याकांडाने भारतीय जनतेला मोठा धक्का बसला. या पार्श्वभूमीवर गांधीजींनी जनतेला संघटित होण्याचे, अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचे आणि अहिंसक मार्गाने संघर्ष करण्याचे आवाहन केले. त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी 'नवजीवन' हे महत्त्वाचे माध्यम ठरले.'नवजीवन'मध्ये केवळ राजकीय विषयांवरच लेखन होत नव्हते. गांधीजींनी भारतीय समाजातील विविध समस्यांवरही भाष्य केले. अस्पृश्यता निर्मूलन, स्वच्छता, स्त्रियांचा सन्मान, ग्रामविकास, स्वावलंबन आणि नैतिक जीवन यांसारख्या विषयांवर जनजागृती करण्यात आली. भारतीयांनी परदेशी वस्तूंचा त्याग करून स्वदेशी वस्तूंचा वापर करावा, असा संदेशही या माध्यमातून दिला जात होता.गांधीजींच्या मते स्वराज्य म्हणजे केवळ ब्रिटिश सत्तेपासून मुक्ती नव्हे, तर भारतीय समाजाने स्वतःच्या जबाबदाऱ्या ओळखून स्वावलंबी होणे होय. त्यामुळे 'नवजीवन'मधील लेखांमधून राजकीय स्वातंत्र्यासोबत सामाजिक आणि नैतिक परिवर्तनावरही भर देण्यात आला.गांधीजींच्या पत्रकारितेचे वैशिष्ट्य म्हणजे सत्य आणि साधेपणा. त्यांचे लेखन सामान्य माणसाला समजेल अशा भाषेत असे. त्यांनी पत्रकारितेचा वापर लोकांना भडकवण्यासाठी नव्हे, तर त्यांना योग्य दिशा देण्यासाठी केला. अन्यायाविरोधात संघर्ष करताना अहिंसा आणि संयम राखण्याचा संदेश त्यांनी सातत्याने दिला.'नवजीवन'सोबतच गांधीजींनी 'यंग इंडिया' या इंग्रजी साप्ताहिकाचेही संपादन केले. 'यंग इंडिया'च्या माध्यमातून त्यांचे विचार इंग्रजी वाचकांपर्यंत, तर 'नवजीवन'च्या माध्यमातून विशेषतः गुजराती भाषिक जनतेपर्यंत पोहोचले.भारतीय स्वातंत्र्यलढ्यात 'नवजीवन' हे गांधीजींच्या विचारांचे प्रभावी व्यासपीठ ठरले. सत्याग्रह, अहिंसा, स्वदेशी आणि स्वराज्य या विचारांचा प्रसार करण्यामध्ये या वृत्तपत्राचे योगदान महत्त्वाचे आहे.आजच्या काळातही 'नवजीवन'चा इतिहास पत्रकारिता आणि समाजजागृतीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

# जहीर खान : भारतीय क्रिकेटचा डावखुरा वेगवान गोलंदाज

**जन्मदिन विशेष**

जहीर खान यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९७८ रोजी महाराष्ट्रातील श्रीरामपूर येथे झाला. भारतीय क्रिकेट संघातील ते एक उत्कृष्ट डावखुरे वेगवान गोलंदाज म्हणून ओळखले जातात. आपल्या वेगवान आणि स्विंग गोलंदाजीच्या जोरावर त्यांनी भारतीय संघाला अनेक महत्त्वाच्या सामन्यांत विजय मिळवून दिला.जहीर खान यांनी २००० मध्ये भारतीय संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यांनी कसोटी, एकदिवसीय आणि ट्रेन्टी-२० या तिन्ही प्रकारांत भारताचे प्रतिनिधित्व केले. सुरुवातीच्या काळात वेगवान गोलंदाज म्हणून त्यांनी आपली छाप पाडली. पुढे त्यांनी स्विंग आणि रिव्हर्स स्विंगवर विशेष प्रभुत्व मिळवले.कसोटी क्रिकेटमध्ये जहीर खान यांनी ९२ सामने खेळून ३११ बळी घेतले. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्यांनी २०० सामन्यांत २८२ बळी मिळवले. त्यांच्या गोलंदाजीमध्ये वेगासोबतच अचूकता आणि



चेंडूला दोन्ही बाजूंनी स्विंग करण्याची क्षमता होती. त्यामुळे जगातील अनेक नामांकित फलंदाजांसाठी ते धोकादायक गोलंदाज ठरले.जहीर खान यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे २०११ चा क्रिकेट विश्वचषक. भारताने महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली विश्वचषक जिंकला. या स्पर्धेत जहीर खान यांनी २१ बळी घेतले आणि भारतीय गोलंदाजीचे नेतृत्व केले. विश्वचषकात सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये त्यांचा समावेश होता.जहीर खान यांच्या कारकिर्दीत दुखापतींचे अनेक अडथळे आले. मात्र प्रत्येक वेळी त्यांनी मेहनत करून संघात पुनरागमन केले. इंग्लंडमधील काऊंटी क्रिकेटमध्ये खेळताना त्यांनी आपल्या गोलंदाजीमध्ये अनेक तांत्रिक सुधारणा केल्या. यामुळे त्यांच्या गोलंदाजीमध्ये अधिक अचूकता आणि विविधता आली.भारतीय क्रिकेटमधील त्यांच्या योगदानासाठी जहीर खान यांना २०११ मध्ये अर्जुन पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर भारत सरकारने त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल घेत २०२० मध्ये पद्मश्री पुरस्काराने त्यांचा सन्मान केला.जहीर खान यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही क्रिकेटशी संबंध कायम ठेवला. प्रशिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून त्यांनी अनेक युवा क्रिकेटपटूंना मार्गदर्शन केले. विशेषतः वेगवान गोलंदाजांना तांत्रिक आणि मानसिकदृष्ट्या तयार करण्यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले.भारतीय क्रिकेटमध्ये डावखुरा वेगवान गोलंदाज म्हणून जहीर खान यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. वेग, स्विंग, रिव्हर्स स्विंग, अचूकता आणि सामन्याच्या परिस्थितीनुसार गोलंदाजी करण्याची क्षमता ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये होती. भारतीय संघाला परदेशी मैदानांवरही प्रभावी वेगवान गोलंदाजीची ताकद देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे जहीर खान यांचे नाव भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील महान वेगवान गोलंदाजांमध्ये घेतले जाते. जहीर खान यांनी इंडियन प्रीमियर लीगमध्येही महत्त्वाची भूमिका बजावली. खेळाडू म्हणून निवृत्तीनंतर त्यांनी विविध संघांसोबत मार्गदर्शक आणि गोलंदाजी सल्लागार म्हणून काम केले. युवा गोलंदाजांना तांत्रिक मार्गदर्शन देताना त्यांनी आपल्या अनुभवाचा उपयोग केला.

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# संगमनेरच्या सहा आयर्नमॅन वीरांची कोरियात कामगिरी

## डॉ. अमोद कर्पे, डॉ. संजय विखे, करण राजपाल, सीए आदित्य राठी, अमर नायकवाडी व महेश झंवर आयर्नमॅन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिद्द, चिकाटी, शिस्त आणि प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर संगमनेरच्या सहा सुपुत्रांनी आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात शहराचे नाव अभिमानाने उंचावले आहे. दक्षिण कोरियातील गुर्ये येथे ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या प्रतिष्ठेच्या आयर्नमॅन गुर्ये कोरिया २०२६ या स्पर्धेत डॉ. अमोद कर्पे, डॉ. संजय विखे, करण राजपाल, सीए आदित्य राठी, अमर नायकवाडी आणि महेश झंवर यांनी तब्बल २२६ किलोमीटरचे खडतर आव्हान यशस्वीपणे पूर्ण केले. अधिकृत माहितीनुसार ही स्पर्धा ३.८ किलोमीटर पोहणे, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२.१९५ किलोमीटर धावणे अशा तीन टप्प्यांत पार पडली.

संगमनेरच्या या सहाही खेळाडूंनी वेगवेगळ्या वयोगटांत उल्लेखनीय कामगिरी केली. करण राजपाल यांनी सर्वांत सरस कामगिरी करत ११ तास ४ मिनिटे २३ सेकंदांत स्पर्धा पूर्ण केली. त्यांच्या वयोगटात त्यांना १०५ स्पर्धकांमध्ये २७ वे स्थान मिळाले. सीए आदित्य राठी यांनी १२ तास ५५ मिनिटे १६ सेकंदांत, तर अमर नायकवाडी यांनी १२ तास ५८ मिनिटे ३६ सेकंदांत हे आव्हान पूर्ण केले. डॉ. अमोद कर्पे यांनी १३ तास ६ मिनिटे ४८ सेकंदांत स्पर्धा पूर्ण केली. पन्नाशी ओलांडल्यानंतरही डॉ. संजय विखे यांनी १४ तास ५६ मिनिटे ३४ सेकंदांत २२६ किलोमीटरचा हा कठीण प्रवास पूर्ण केला, तर महेश झवर यांनी १५ तास २० मिनिटे ३८ सेकंदांत स्पर्धा पूर्ण करत जिद्द आणि चिकाटीचे दर्शन घडवले.

गुर्ये येथील स्पर्धेचा मार्गही आव्हानात्मक होता. जिरिसान तलावातील पोहण्याच्या टप्प्यानंतर खेळाडूंना डोंगररांगा, भातशेती आणि सेओमजिन नदीच्या परिसरातून १८० किलोमीटरचे सायकलिंग करावे लागले. त्यानंतर ४२.१९५ किलोमीटरची धाव पूर्ण करावी लागली. म्हणजेच एका दिवसात शरीराची कमाल क्षमता पणाला लावत पोहणे, सायकलिंग आणि धावणे अशी सलग तीन आव्हाने पूर्ण करावी लागतात.

या सहाही खेळाडूंच्या यशामागे सातत्यपूर्ण सराव, वेळेचे काटेकोर नियोजन आणि मानसिक कणखरता आहे. विशेष म्हणजे दैनंदिन व्यावसायिक व सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी दीर्घकाळ तयारी केली.

वैद्यकीय सेवा, व्यावसायिक क्षेत्र आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या या सहाही जणांनी कोरियाच्या भूमीवर केलेल्या या कामगिरीमुळे संगमनेरचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडा नकाशावर अधोरेखित झाले आहे. त्यांच्या या यशाचे संगमनेर शहरासह जिल्ह्यातील विविध स्तरांतून कौतुक होत असून, त्यांच्या कामगिरीमुळे युवकांना व्यायाम, धावणे, सायकलिंग आणि जलतरण या क्षेत्रांकडे वळण्याची नवी प्रेरणा मिळणार आहे.

# ज्ञानेश कुमार हे भाजपचे निवडणूक जिंकण्याचे हत्यार - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- देशामध्ये आणि राज्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात तरुणाईमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. एसआयआरच्या मुद्द्यावर काँग्रेस नेते खा.राहुल गांधी यांच्या प्रश्नांना निवडणूक आयोग उत्तरे देऊ शकत नाही. निवडणूक आयोग हा भाजपचे बाहुले झाला असून ज्ञानेश कुमार हे भाजपाचे निवडणूक जिंकण्याचे हत्यार असल्याची टीका काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे . तर राज्य सरकार दुष्काळी पंचनामेंसाठी दोन साक्षीदार मागत आहे हा अत्यंत हास्यास्पद प्रकार असल्याची टीकाही त्यांनी केली आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध धोरणांवर माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तथा राज्याचे मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राज्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे आता सरकारने पंचनाम्याचा कोणताही फार्स न करता तातडीने शेतकऱ्यांना मोठी मदत केली पाहिजे. आपणही राज्यात कृषी व महसूल मंत्री म्हणून काम केले असून त्यावेळेस शेतकऱ्यांना विनाअट मदत मिळत होती. आता दुष्काळी पंचनामे करण्यासाठी दोन शेजारच्या साक्षीदारांची आवश्यकता असल्याचे सरकारने म्हटले आहे. हा अत्यंत हास्यास्पद प्रकार आहे. शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे .पाऊस नाही. पिके जळून गेली आहे. समोर दिसते आहे. शेजारच्यांना विचारायची गरज काय असा सवाल करताना शेतकऱ्यांमध्ये भांडण लावण्याचा प्रकार सरकारचा असल्याची टीका त्यांनी केली. त्याचबरोबर ज्ञानेश कुमार यांचा वापर हा लोकशाहीचा घात करण्यासाठी भाजपकडून केला जात आहे. ते भाजपची निवडणूक जिंकण्याचे हत्यार बनले आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तरे देणे ही निवडणूक आयोगाचे काम आहे मात्र भाजपचे लोक त्याचे उत्तर देत आहेत. भाजप त्यांचे का समर्थन करत आहे हा मोठा प्रश्न असून एसआयआर च्या मुद्द्यावर दिल्लीमध्ये सुरू असलेल्या आंदोलनामध्ये भाजपने सुद्धा सहभागी झालं पाहिजे होते . मात्र ते निवडणूक आयोगाचे समर्थन करत आहे. निवडणूक आयोगाचा वापर करत आहे.

भाजपचा हेतू सुद्धा नाही. निवडणुकीमध्ये वेगवेगळे फंडे वापरून सत्तेमध्ये राहायचे ही भाजपची पद्धत आहे. राज्यामध्ये एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन सुरू आहे. खरे तर कायद्यापेक्षाही नैतिकतेच्या मुद्द्यावर एमपीएससीच्या अध्यक्षांनी राजीनामा दिला पाहिजे. एमपीएससीचे हे मुलं शेतकरी, शेतमजूर ,आणि बारा बलुतेदारांची मुलं आहे. हे मुलं वर्षानुवर्ष अभ्यास करतात आणि धनदांडग्याची मुले पेपर फोडून पास होतात. आणि अभ्यास करणारे नापास होतात. त्यामुळे सरकारने तातडीने एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनामा घ्यावा अशी मागणी ही काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

# जमिनीच्या व्यवहारातून नैराश्य- बेकरी चालकाची आत्महत्या

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील कुरण रोड परिसरातील ५० वर्षीय बेकरी चालक रामअवतार गुप्ता यांनी जमिनीच्या व्यवहारातून आपली फसवणूक झाल्याचा आरोप करत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सकाळी निंबाळे शिवारात घडली. आत्महत्येपूर्वी त्यांनी काही व्हिडिओ तयार केले असून, त्यामध्ये जमिनीच्या व्यवहाराशी संबंधित व्यक्तींची नावे घेतल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर राजापूरमधील देखील एका तरूणाला आत्महत्येस प्रवृत्त करण्यात आले असून या प्रकरणी देखील काही जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे संगमनेर शहरात खळबळ उडाली आहे.



रामअवतार गुप्ता

रामअवतार गुप्ता हे कुरण रोड परिसरात बेकरी व्यवसाय चालवत होते. कोल्हेवाडी रोड परिसरातील चार गुंठे जमिनीच्या व्यवहारातून आपली फसवणूक झाल्याचा त्यांचा आरोप होता. संबंधित जमिनीचा ताबा मिळत नसल्याने ते नैराश्यात होते. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी काही व्हिडिओ तयार करून आपल्यावर झालेल्या कथित फसवणुकीबाबत माहिती दिल्याचे सांगितले जात आहे. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नातेवाईक तसेच काही सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, मंगळवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास निंबाळे शिवारातील एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत रामअवतार गुप्ता यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला.

या प्रकरणी मयत रामअवतार गुप्ता यांचा मुलगा अविनाश रामअवतार गुप्ता (रा. विजयनगर, कुरण रोड, संगमनेर) यांनी शहर पोलिसांत फिर्याद दिली आहे. कोल्हेवाडी रोड येथील चार गुंठे जमिनीचा ताबा न देता किसन सखाराम काळे आणि बाळू उर्फ रवींद्र किसन काळे (दोघेही रा. कोल्हेवाडी रोड, संगमनेर) यांनी वडिलांना नैराश्यात टाकून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या फिर्यादीवरून संगमनेर शहर पोलिसांनी किसन काळे आणि बाळू उर्फ रवींद्र काळे यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

रामअवतार गुप्ता यांनी आत्महत्येपूर्वी तयार केलेल्या व्हिडिओतील दावे, जमिनीचा व्यवहार, चार गुंठे जमिनीचा ताबा तसेच संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत आता पोलिस तपास सुरू आहे. या घटनेमुळे जमिनीच्या खरेदी-विक्रीतील व्यवहारांची पारदर्शकता, मध्यस्थांची भूमिका आणि नागरिकांची होणारी कथित फसवणूक याबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## राजापूरमधे तरूणाची आत्महत्या

तर दुसरी घटना राजापूर येथे म्हाळुंगी नदीजवळ घडली आहे. राजापूर येथील अल्ताफ पठाण (वय २३) यास अलाउद्दीन मेहमूद पटेल (रा. कुरण), आझिम मुनवर शेख (काल्या, रा. कुरण), नाझिम मुनवर शेख (बड्या), विचू अज्जू (रा. कुरण), नावेज पठाण (संगमनेर) यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली असल्याचे मयत तरुणाची आई समिना भैय्या पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

सदर दोन्ही घटनांचा तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

दर्शन
टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू । कांजीवरम । सिल्क पैठणी । बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25